Thursday, March 05, 2009

## 25 women among 100 cancer patients

Publication: Maharashtra Times, Edition: Mumbai/Pune, Journalist: Bureau, Page No: 10

# शंभर कॅन्सरग्रस्तांमध्ये २५ महिला

म. टा. प्रतिनिधी

विडी, सिगारेट, गुटखा, मशेरी, हुक्का अशा विविध मार्गाने तंबाखूचे सेवन करणाऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण वाढत असून शंभर कॅन्सरग्रस्त महिलांमागे पंचवीस महिलांना तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कॅन्सर होत असल्याचे दिसून आले आहे. भारतीयांमध्ये जागृती घडवून आणण्यासाठी येत्या ८ ते १४ मार्च या कालावधीत तंबाखू आणि आरोग्य विषयक जागतिक परिषद मुंबईत होणार आहे.

जागतिक स्तरावर तंबाखू सेवनाला आळा घालण्यासाठी दरवर्षी या परिषदेचे आयोजन केले जाते. यंदा या परिषदेचे यजमानपद भारताकडे आहे. राज्य सरकारचे सार्वजनिक आरोग्य खाते आणि केंद्र सरकारचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या सहयोगाने सलाम बॉम्बे, हेलिस, एसीटी इंडिया या आरोग्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्थांनी आयोजनाची जबाबदारी स्वीकारली आहे. यासंदर्भात झालेल्या पत्रकार परिषदेला १४व्या जागतिक तंबाखू आणि आरोग्यविषयक परिषदेचे अध्यक्ष डॉ. पी. सी. गुप्ता, टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे डॉ. पंकज चतुर्वेदी, सलाम बॉम्बे फाउंडेशनच्या पद्मिनी सोमानी उपस्थित होत्या.

## तंबाखूविरोधी जागृतीसाठी जागतिक परिषद

भारतात तंबाखूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे सिगारेट, पानमसाला किंवा गुटखा निर्मितीचे प्रमाणही अधिक आहे. परिणामी तंबाखू सेवन करणाऱ्यांचे प्रमाणही मोठे आहे आणि आता महिलांमध्येही ते वाढत असल्याचे डॉ. गुप्ता यांनी सांगितले. महिलांप्रमाणेच भारतातील तरुण आणि लहान मुलांमध्येही तंबाखू सेवनाचे प्रमाण वाढत असल्याचे डॉ. चतुर्वेदी यांनी सांगितले.

तंबाखू आणि मनोरंजन उद्योग, महिला आणि तंबाखू नियंत्रण, खेळ आणि तंबाखू, तंबाखू आणि हृदयविकार तसेच इतर आजार, तंबाखू आणि प्रसारमाध्यमे, धूम्रपानाचे प्रकार आणि वापर इत्यादी विषयांचा परिषदेत समावेश असेल. नरिमन पॉइंट येथील एनसीपीए येथे परिषद होणार असून परिसंवाद, स्लाइड शो, चर्चासत्रे, डॉक्टरांची मार्गदर्शनपर व्याख्यानेही होतील. परिषदेचे उद्घाटन ८ मार्चला राज्यपाल एस.सी.जमीर करणार आहेत.